28 APR 2008

१०२५८

शासन ज्ञापन क्रमांकः एलआरएफ-२६०७/४१९/प्र.क्र. ११७/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - २८ एप्रिल, २००८

विषयः- **जमीन - मुंबई उपनगर जिल्हा**
मौजे कांदिवली, ता. बोरीवली येथील नभूक्र. १३०० पैकी मधील जमीन माध्यमिक शाळा तसेच मैदान या प्रयोजनाकरिता मंजूर करण्याबाबत मे. झगडूसिंग चॅरिटेबल ट्रस्ट यांची मागणी.

**ज्ञापनः-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या पत्र क्र. सी/कार्या-७-ब/६२/कावि-२१८/०७, दि.२६/४/२००७, दि. ७/९/२००७, दि. १०/१०/२००७ तसेच विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडील पत्र क्र.मशा/का-२/जमिन-३/कावि-४२२/२००६, दि. ६/८/२००७, दि. ५/९/२००७, ११/१०/२००७ ला अनुलक्षून विज्ञप्तिपूर्वक असे कळविण्यात येते की, मौजे कांदिवली, ता. बोरीवली, नभूक्र. १३०० पै माध्यमिक शाळेसाठी प्रस्तावित ७४२.७० चौ.मी. जमीन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ तसेच त्याखाली तयार करण्यात आलेल्या सरकारी जमिनींचे वितरण नियमावली १९७१ मधील नियम क्र. ६ तसेच शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक प्रयोजनार्थ जमीन देताना अवलंबावयाच्या धोरणाबाबत शासन निर्णय दि. ८/३/१९८३ व दि. ११/५/१९८४ मधील सुचनानुसार उक्त जमिनीच्या सहाय्यक संचालक, नगररचना यांचेकडून निर्धारित करण्यात येणा-या दि.१/२/१९७६ रोजीच्या किंमतीच्या २५% किंमतीस कब्जेहक्काने व याच नगर भूमापन क्रमांकामधील खेळाच्या मैदानासाठी आरक्षित ३८ चौ.मी. जमीन दि. १/२/१९७६ रोजीच्या किंमतीच्या १०% रकमेच्या जमीन मंजुरीच्या दिनांकास असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पी.एल.आर. दरानुसार भाडेपट्टयाने १५ वर्षे मुदतीकरिता नेहमीच्या अटी व शर्तीवर तसेच खालीलप्रमाणे अतिरिक्त अटी/शर्तीवर मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अटीः- अ) सदर जमीन भोगवटा वर्ग-२ आणि भाडेपट्टेधारक (१५ वर्षे मुदतीकरिता) म्हणून मंजूर करण्यात येत असून ती अन्य प्रयोजनाकरिता वापरता येणार नाही. त्याचप्रमाणे जमिनीचे हस्तांतरण करता येणार नाही.

ब) शैक्षणिक, सामाजिक, धर्मादाय इत्यादी प्रयोजनाकरिता शासकीय जमीन वाटपाबांबतचे सुधारीत धोरण शासनाच्या विचाराधीन असल्याने त्यामध्ये घेण्यात येणारे निर्णयही या प्रकरणी लागू करण्यात यावेत व तसे रु.२००/- च्या स्टॅम्प पेपरवर हमीपत्र संस्थेकडून घेण्यात यावे.

क) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडून घालण्यात येणाऱ्या इतर अटी व शर्ती.

२. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५१२/०७/व्यय-९, दि. १९/११/२००७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

WS-380/08

( वि. सि. वखारे )
अवर सचिव,
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१.

कृमाप...

Scanned by CamScanner